श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

दि १६.०४.२०२४

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

विषय :- श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात होणाऱ्या सहस्त्रनामावली पूजा, सहस्त्रावर्तन पूजा, सत्यनारायण पूजा, श्रीसत्यविनायक पूजा व पंचामृत पूजेसाठी हार, फुले व इतर साहित्य विहित पद्धतीने खरेदी करण्याकरीता मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

वरील कामाकरिताअटी, शर्तीबाबतची माहिती व दरपत्रके डाउनलोड करण्यासाठी न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेत स्थळावर भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| दरपत्रके प्रसिद्धीचा दिनांक | : | बुधवार, दि १७ एप्रिल ,२०२४ |
| दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक | : | बुधवार, दि. २४ एप्रिल ,२०२४ |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | : | गुरुवार , दि २५ एप्रिल ,२०२४ |

अटी व शर्ती :-

१) मूळ दरपत्रकात नमूद हार व फुले खरेदी करण्यासाठी मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

२) मान्य दरानेच सदर हार व फुलाचा पुरवठा करावा लागेल. कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही / मागता येणार नाही. याप्रकरणी न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील. न्यासाच्या मागणीनुसार हार व फुले पुरवठा करण्यात यावा. तक्त्यात नमूद केलेली वस्तूंची संख्या कमी जास्त होऊ शकेल.

३) सदर हार व फुलांचा पुरवठा स्वखर्चाने न्यासाच्या खरेदी विभागाच्या गोडाऊनमध्ये पकिंग व फॉरवडिंगसह पोहोच करावा लागेल. न्यासाकडून वाहतुकीचा खर्च वेगळा दिला जाणार नाही.

४) सदर हार व फुलांचे कार्यादेश प्राप्त झाल्यापासून हार व फुलांचा पुरवठा करण्याची जबाबदारी आपली राहील.

५) दरपत्रकामध्ये कर वगळून दराचा उल्लेख करावा. सरकारी नियमाप्रमाणे आवश्यक तेथे आयकर कपात केली जाईल.

६) उपरोक्त अटी व शर्ती काही बदल, सुधारणा करण्याचा वा जादा अटी शर्ती विहित करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. आपली कोणतीही अट / अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाही.

७) दरपत्रकधाराने मोहरबंद दरपत्रकासोबत साक्षांकित करून सादर करावयाची कागदपत्रे.

अ) आयकर नोंदणी पन कार्ड

ब) सेवाकर जी.एस.टी नोंदणी दाखला.

८) पुरवठा केलेल्या हार व फुलांचा दर्जा उत्तम असणे आवश्यक आहे . त्यात तफावत आढळल्यास करार रद्द करण्यात येईल.

९) कोणतेही कारण न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

१०) कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक निवडप्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

११) हार व फुलांचा साहित्याचा पुरवठा कालावधी समाप्त झाल्यास, पुढील मोहरबंद दरपत्रके प्रक्रिया पूर्ण होईपर्यत हार व फुलांचा पुरवठा वरील मान्य दरानुसार न्यासाच्या खरेदी विभागात पोहच करावयाचा आहे.

Vpatil

( वीणा पाटील )

कार्यकारी अधिकारी

दिनांक – / / २०२४

मूळदरपत्रक

दरपत्रकामध्ये खालील बाबी अंतर्भुत करण्यात याव्यात.

निविदाधारकाचे नाव:---------------------------------------------------------------------------------

निविदाधारकाचा कायमचा पत्ता:-----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

निविदाधारकाचा नोंदणी क्रमांक:-----------------------------------------------------------------------

जी एसटी क्रमांक:--------------------------------------------------------------------------------------

## BOQ

| A | B | C | D | E | F | G |
|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | पूजेच नांव | साहित्यांचा तपशील (फुले, हार व पाने इत्यादी ) | दर प्रति **पूजा साहित्य, संच, (सर्व कर वगळून)** | अंदाजे वार्षिक **(दिवस)** | अंदाजे वार्षिक **(पूजा)** | एकूण किंमत **(सर्व कर वगळून)** G = (D x E) / G = (D x F) |
| १ | **पंचामृत पूजा प्रत्यक्ष बसून पुजा** दररोज सकाळी | मिक्स फुले – २किलो (अष्टर,बीजली,शेवंती,कापरी गोंडा) पांढरी फुले – पाव किलो (कागडा,मोगरा,जुई,निवाळी) दुर्वा जुडी–२०नग,जास्वदं फुले–१००नग,विडयाची पाने–१००नग टीप – मंगळवार व संकष्ट चतुर्थीच्या दिवशी वरील फुलांचा १संच अतिरीक्त घेण्यात येईल. | | ३६५ | – | |
| २ | **सहस्त्रनामावली पूजा, प्रत्यक्ष बसून पुजा** नोंदणी करण्यात आलेले दिवस | एका पूजेचे साहीत्य – मिक्सफुले – दिड किलो, (अष्टर,बीजली,शेवंती,कापरीगोंडा) कनेरी गुलाबी फुले – (१००० नग) पांढरी फुले – २५०ग्रॅम,(कागडा,मोगरा,जुई,निवाळी) दुर्वा जुडी – ३नग, चाफा फुले – २०नग, ३ फुटांचा गुलाबाच्या पाकळयांचा हार – १ नग | | – | १००० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | **<u>सहस्त्रावर्तन पूजा, प्रत्यक्ष बसून पुजा</u>**<br>नोंदणी करण्यात आलेले दिवस | एका पूजेचे साहीत्य –<br>मिक्सफुले – पाव किलो,<br>(अष्टर,बीजली,शेवंती,कापरीगोंडा)<br>पांढरी फुले –<br>१००ग्रॅम,(कागडा,मोगरा,जुई,निवाळी)<br>दुर्वा जुडी – ३नग,जास्वदं फुले–<br>१०नग,चाफा फुले– २०नग, | | – | ६०० | |
| ४ | **<u>श्री सत्यनारायण महापूजा</u>**<br>नोंदणी करण्यात आलेले दिवस | एका पूजेचे साहीत्य –<br>केळीचे छोटे खांब – ४ नग,<br>आंबा डहाळे – १ नग,<br>दुर्वा जुडी – १ नग,<br>तुळस – ३ मोठे बंडल ( १००० नग<br>मंजीरी देठ तुळस),<br>मिक्स फुले – पाव<br>किलो,(जास्वंद,बीजली,शेवंती) | | – | १००० | |
| ५ | **<u>श्री सत्यविनायक महापूजा</u>**<br>नोंदणी करण्यात आलेले दिवस | एका पूजेचे साहीत्य –<br>केळीचे छोटे खांब – ४ नग,<br>आंबा डहाळे – १ नग,<br>दुर्वा जुडी – १५ नग,<br>मिक्स फुले – पाव<br>किलो,(जास्वंद,बीजंली,शेवंती) | | – | १२० | |
| | | | | | एकूण किंमत **(सर्व कर वगळून)** | |

निविदाधारकाची सही व शिक्का

टीप – वरिल तक्त्यातील प्रत्येक क्रमांका समोरील साहित्याच्या रकान्यात नमूद केलेले साहित्य हे त्या त्या पूजेनूसार एक संच आहे. निविदाधारकाने निविदा भरतेवेळी संपूर्ण संचाकरीता दर सादर करावायाचे आहे. याबाबत अधिक माहितीसाठी न्यासाच्या खरेदी विभागाशी संपर्क साधावा.
संपर्क क्र. ८१०८८६००००.